बुधवार, दि १९ मार्च २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक २५ वा ● किंमत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

## खातेदारांची फसवणूक टाळण्यासाठी फायनान्शिअल इंटेलिजन्स युनिट सुरु करणार - मुख्यमंत्री फडणवीस

### आ. बबनराव लोणीकर यांच्या प्रश्नानंतर मुख्यमंत्र्यांचे उत्तर

**मुंबई -** ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीने लोकांचे बुडवलेले पैसे परत करण्यासंदर्भात माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी आज विधानसभेमध्ये प्रश्न उपस्थित केला. याबाबत स्वतः मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले.

या उत्तरादरम्यान देवेंद्र फडणवीस म्हणाले की ज्ञानराधा मल्टीस्टेट प्रमाणे इतर कुठलाही सोसायटीच्या वतीने खातेदारांची फसवणूक होऊ नये यासाठी फायनान्शिअल इंटेलिजन्स युनिट सुरू करणार असल्याची माहिती दिली. या युनिटच्या माध्यमातून अधिकचा व्याजदर कसा दिला जाईल या संदर्भात संबंधित सोसायटीला या युनिटला कळवावे लागणार आहे त्यामुळे त्यांचा अत्याधिक व्याजदर देताना त्यांना कुठल्या माध्यमातून दिला जाणार आहे याबाबतचा खुलासा करणे अपेक्षित असणार आहे.



त्याचबरोबर या घोटाळ्याच्या संदर्भाने सहकार राज्यमंत्री पंकज भोयर यांनी देखील मागील आठवड्यात उत्तर दिले होते त्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सहकार मंत्री, सहकार राज्यमंत्री व ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करणारे आमदार बबनराव लोणीकर यांच्यासह मराठवाड्यातील इतर लोकप्रतिनिधी यांची म हत्त्वपूर्ण बैठक आयोजित केली जाणार आहे. अशी माहिती देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली.

## औरंगजेबची कबर हटवण्याची आ. अर्जुन खोतकर यांची मागणी



**मुंबई -** सध्या महाराष्ट्रभरामध्ये औरंगजेब यांची कबर हटवण्याची मागणीवरून जोरदार वादंग सुरू असतांनाच मंगळवार (दि १८) रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास मुंबई येथे जालन्याचे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी माध्यमांशी संवाद साधत असताना औरंगजेब यांची कबर लवकरात लवकर हटवण्याची मागणी केली. यावेळी माध्यमांशी बोलताना आ. खोतकर म्हणाले की और औरंगजेब यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या घराण्यावर जो क्रूरपणे अत्याचार केला. त्याबाबत कोणीही औरंगजेबची कबर हटवण्यासाठी विरोध करणार नसून मुसलमान लोकं सुद्धा कबर हटवण्याची मागणी करत असल्याचे खोतकर म्हणाले. पुढे बोलताना आ. खोतकर म्हणाले की नुकताच प्रदर्शित झालेला छावा चित्रपट पाहिल्यानंतर तरुणांमध्ये प्रचंड चीड निर्माण झाली असून कबर हटवण्याची मागणी सर्व स्तरातून होत असल्याने शासनाच्या वतीने ही कारवाई लवकर करण्यात येईल असे आ.खोतकर म्हणाले.

युवा आदर्श

### रंगपंचमी ...

रंगपंचमी भिन्न रंग
पांढरा निळा हिरवा
सोनेरी चंदेरी पारवा
पिवळा काळा भगवा
विविधपक्षांचे पुढारी
बोलतात रंग लावा
प्रथमचं सन्मान मिळे
सर्वत्र आम्हां बुलावा
वेगळी विचारसरणी
कुणी डावा न् उजवा
स्वागतासाठी त्यांच्या
घरे दारे सारी सजवा
सारे किती आसूसले
मतदार राजास रंगवा
आपल्या पक्षात आणूं
आश्वासनातचं दंगवा
हर पक्षीय रंग लावा
कशास कुणा दुखवा
मतदार मी सार्वभौम
जागा योग्य रे दाखवा
झाल्यावर रंगपंचमी
स्नानसोहळा करावा
रंग सगळ्या पक्षांचा
हळू हळू दूर सारावा
कच्चे रंग ते ढळतीलं
चेहरा मुळचा दाखवा
सावधान रे मतदारां
रंगपंचमी हा चकवा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## खोट्या तक्रारी करून ग्रामपंचायतीची बदनामी करणाऱ्यांविरूध्द कारवाई करा

### ग्रामस्थांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** खोटे आरोप करून प्रशासनाची दिशा भूल करत ग्रामपंचायत अकोली या स्वाइस्त संस्थेची खोट्या तक्रारी करून समाज माध्यमातून ग्राम पंचायतची बदनामी करणार्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

या संदर्भात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सार्वजनिक व वैयक्तिक विकासाची कामे मोठ्या प्रमाणात करण्यात आलेली असून अकोली शिवारामध्ये ग्राम पंचायतीने शेतकर्यांना शेतात जाण्यासाठी अडचणी येऊ नये म्हणून १३ पांदन रस्त्यापैकी १२ पांदन रस्त्यांचे बांधकाम पूर्ण केलेले आहे. तसेच एक रस्ता जो बाकी आहे त्या रस्त्याचे तक्रारदार सिद्धेश्वर सोळंके यांनीच काम आडवलेले आहे. सदर रस्त्याचे कामे ही दर्जेदार झाले असून शेतकर्यांनी याबाबत समाधान व्यक्त केले आहे. त्याचबरोबर शेतकर्याला शेतातील माल वाहतुकीसाठी कुठलीही अडचण राहिलेली नाही. अकोली ग्रामपंचायतीने डिजिटल अंगणवाडी बांधकाम, प्रशस्त प्ले ग्राऊंड, दर्जेदार सीमेंट रस्ते, स्मशानभूमी बांधकाम भूमिगत गटार, अश्या प्रकारच्या ग्रामपंचायत ने उत्कृष्ट दर्जेची कामे केली आहेत. याची पाहणी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मिना यांनी पाहणी करून सर्व कामाची प्रशंसा केली आहे. अशी कामे जिल्ह्यातील प्रत्येक ग्राम पंचायतीने करावीत असे आव्हान त्यांनी अकोली या गावातून प्रसार माध्यमातून केलेली आहे. त्याचबरोबर मागेल त्याला सिंचन विहीर, शेततळे, जिल्ह्यात मजुरांना सर्वात जास्त काम देणारी ग्रामपंचायत अकोली ग्रामपंचायत आहे. या केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या योजनेप्रमाणे अकोली या गावाने गावातील प्रत्येक कुटुंबाला अहिल्यादेवी सिंचन विहीर, शेततळे देण्याचे काम केले आहे. त्यामुळे गावातील सिंचन विहीर लाभार्थ्यांचे उत्पन्न हे दुपटी पेक्ष्याही जास्त वाढलेले आहे. त्यामुळे शेतकर्यांना दुसर्यांच्या शेताता काम करण्यासाठी जाण्याची गरज भासत नाही. मात्र, अकोली या ग्राम पंचायतीने वैयक्तिक लाभामध्ये प्रधानमंत्री घरकुल योजना, रमाई घरकुल योजना, अहिल्यादेवी घरकुल योजना या मध्ये सर्वात उत्कृष्ट काम केले आहेत. सर्व कामे पाहून व राजकीय द्वेष्यापोटी गावातील काही मंडळी ज्यांना विकास बगवत नाही अश्या गावद्रोही तक्रारदराने वारंवार खोट्या तक्रारी केल्या आहेत. त्यामध्ये १० एप्रिल २०२३ रोजी अश्याच खोट्या तक्रारी देऊन अर्ज केला होता. त्याची चौकशी होऊन सर्व कामे उत्कृष्ट दर्जेची झालेली आहेत असा अहवाल गट विकास अधिकारी पंचायत समिती, परतूर यांनी चौकशी करून दि. ५ जून २०२३ रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर केलेला आहे. त्या अहवालाची प्रत व कामाचे जिओ टॅगिंगचे फोटो देखील होते. स्वतः चा भ्रष्टाचार झाकण्यासाठी खोट्या तक्रारी देऊन उपोषणाला बसलेले आहेत. चोराच्या उलट्या बोंबा या म्हणी प्रमाणे कामात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप ज्यांनी केले आहे. त्यांनीच स्वतःच्या बुडाखालील अंधार लपवण्यासाठी हा खोटा पराक्रम केला असून सिद्धेश्वर सोळंके यांचे वडील पांडुरंग सोळंके हे तात्कालीन जिल्हा परिषद सदस्य असतांना लघुसिंचन (जलसंधारण) विभागाच्या अकोली गावातील पाझर तलाव क्र. ०३ साठी महाराष्ट्र सरकारने संपादित केलेल्या ३ हेक्टर व ९५ आर जमिनीवर **पान ३ वर**

## घरगुती गॅस सिलिंडर वापरणाऱ्या ९ हॉटेल चालकांवर कारवाई

### जालना तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागाची कारवाई; घरगुती वापराचे १७ गॅस सिलिंडर जप्त

**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात व्यवसायिक कामासाठी घरगुती गॅस सिलिंडर वापरणाऱ्या ९ हॉटेल चालकांवर कारवाई करण्यात आलीय. जालना तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागाने ही कारवाई केलीय. या कारवाईत घरगुती वापराचे १७ गॅस सिलिंडर तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागाने जप्त केलेत. जालना शहरात काही हॉटेल चालक आपल्या व्यवसायासाठी व्यवसायिक गॅस सिलिंडर ऐवजी घरगुती गॅस सिलिंडर वापरत असल्याची माहिती जालना तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागाला मिळाली होती. त्या माहितीवरून आज दि.१८ मंगळवार रोजी दुपारी दोन वा. च्या सुमारास जालना तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागाने कारवाई करून १७ घरगुती वापराचे गॅस सिलिंडर जप्त केलेत. या प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयात घरगुती गॅस सिलिंडर वापरणाऱ्या ९ हॉटेल चालकांवर कारवाई संदर्भात प्रस्ताव पाठवण्यात येऊन योग्य ती कारवाई करण्यात येईल अशी माहिती जालना तहसीलदार छाया पवार यांनी दिली.

या कारवाई मध्ये तोरणा अमृततुल्य, पंकज बुंदे, कल्पना रेस्टॉरंट, रामा हाटेल, मदिरा बार अँन रेस्टारेंट, राम टकले, हाटेल दुर्वांकुर, कन्हैया डोसा सेंटर, आईसाहेब भोजनालय आदी आस्थापनेवर कारवाई करण्यात आली.



ही कारवाई तहसीलदार छाया पवार, प्रकाश जाधव (निरीक्षण अधिकारी), शाम सपाटे (पुरवठा निरीक्षक), भावना घुसे (पुरवठा निरीक्षक), विशाल लताड (महसूल सहायक), दिलीप मुळे आदींच्या वतीने करण्यात आली. या कारवाईने घरगुती गस सिलेंडर वापरणाऱ्या व्यवसायिकांचे धाबे दणाणले.

# संपादकीय

## आरोग्य सांभाळा !

राज्यात सूर्यनारायणाने आपला प्रकोप दाखवायला सुरुवात केली आहे. मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच राज्यातील तापमान वाढायला सुरुवात झाली होती. सर्वत्र उकाडा जाणवत होता. आता मार्च महिन्याच्या अखेरीस तर राज्यातील अनेक शहरांचे तापमान उच्चांकी पातळीवर पोहचले आहे. राज्यातील अनेक शहरांचे तापमान ४० अंशाच्या घरात पोहचले आहे. काही शहरांनी तर ४० अंशाचा आकडा देखील पार केला आहे. विदर्भ मराठवाड्यात तर तापमानाने आजच उच्चांक गाठला आहे. पुढील दोन आठवड्यात राज्यातील सर्वच शहरांचे तापमान ४० अंश सेल्सिअसच्या घरात पोहचेल आणि राज्यात प्रचंड उकाडा जाणवेल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. पुढील दोन महिने राज्यातील तापमान उच्चांकी अंशावर पोहचेल आणि राज्यात यावर्षी प्रचंड उकाडा जाणवेल हा हवामान खात्याने वर्तवलेला अंदाज खरा ठरताना दिसत आहे. याशिवाय यावर्षी राज्यात उष्णतेच्या लाटा येतील असाही अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. हा अंदाज नागरिकांची झोप उडवणारा ठरत आहे कारण मार्च महिन्यातच सूर्यनारायणाने आपला प्रकोप दाखवायला सुरुवात केली असल्याने पुढील दोन महिने कसे निघेल याच चिंतेत नागरिक आहेत. पुढील दोन महिन्यात राज्यात उष्णतेच्या लाटा येणार असून तापमान प्रचंड वाढणार असल्याने हे दोन महिने जनतेसाठी जीकरीचे ठरणार असल्याने उन्हापासून बचाव करण्याची कसरत नागरिकांना करावी लागणार आहे. उन्हाळा सुरू झाला की नागरिकांना आरोग्याच्या तक्रारी जाणवू लागतात. उन्हाळ्याच्या झळा वाढल्या की थकवा येणे, चक्कर येणे, हातापायाला गोळे येणे, उष्माघात आणि मृत्यू असे परिणाम माणसांमध्ये दिसून येतात. काहींना डोळ्याचे तर काहींना त्वचेचे विकार जडतात. उन्हाळ्यात विविध प्रकारचे श्वसन विषयक, मेंदूचे आणि हृदयाचे आजार होतात. रक्तदाब आणि मधुमेहासारख्या व्याधी असलेल्या व्यक्तींनी उन्हाळ्यात विशेष खबरदारी घ्यावी. उन्हाळ्यात उष्माघात होण्याचे प्रमाण खूप वाढते. उष्माघातामुळे शरीराचे तापमान उच्च पातळीवर पोहचते. योग्य आणि वेळीच उपचार न मिळाल्यास संबंधित व्यक्ती दगावण्याची शक्यता असते. उष्माघातापासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळावे. दुपारी बारा ते चार घराबाहेर पडूच नये, काही महत्वाचे काम असेल तरच घराबाहेर पडावे. घराबाहेर पडताना टोपी, गॉगल, बूट, चपलांचा वापर करावा. हलकी, पातळ, सच्छिद्र कपडे वापरावेत. उन्हात काम करणाऱ्या व्यक्तींनी टोपी, छत्री, गॉगल यांचा नियमित वापर करावा. तापमान वाढले की शरीरातील पाणी कमी होते त्यामुळे डीहायड्रेशन होते. डीहायड्रेशन झाले की शरीरातील पाणी झपाट्याने कमी होते आणि चक्कर येते. त्यामुळे शरीरातील पाण्याची पातळी कमी होऊ नये यासाठी सतत पाणी पीत राहावे. शरीरात दररोज किमान दोन लिटर पाणी जाणे गरजेचे असते. घराबाहेर पडताना पाण्याची बाटली सोबत न्यायला विसरू नका. साध्या पाण्यासोबत नारळपाणी, भाज्यांचे, फळांचे रस दररोज प्यायले तरी हरकत नाही. मार्च महिन्यातच उन्हाळ्याच्या झळा जाणवू लागल्याने पुढील दोन महिने उष्णतेची तीव्रता किती असेल याची कल्पना केली तरी या वर्षीची उन्हाची दाहकता लक्षात येईल. त्यामुळेच प्रत्येकाने उन्हाळ्यात आपले आरोग्य सांभाळणे गरजेचे आहे. खबरदारी घेऊनच आपण उन्हाच्या तीव्रतेपासून स्वतःचा बचाव करू शकतो.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## राज्यात औरंगजेबाचे उदात्तीकरण नको - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई -** औरंगजेबाने छत्रपती संभाजी महाराजांचा अमानूष छळ केला. तो महाराष्ट्राला उध्वस्त करायला आला होता. त्याचे उदात्तीकरण कोणीही सहन करणार नाही, अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या भावना विधानसभेत व्यक्त केल्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, देशासाठी, धर्मासाठी छत्रपती संभाजी महाराजांनी बलिदान दिले. औरंगजेबाचा कंलक महाराष्ट्रातून पुसला पाहिजे. औरंगजेबाचे उदात्तीकरण करणे म्हणजे देशद्रोह असून त्यांना महाराष्ट्र माफ करणार नाही, असेही उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. जे लोक औरंगजेबाच्या समर्थनासाठी पुढे येतील त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल, असा इशारा उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिला.

# तंत्रशुद्ध गझलेचा गळा घोटण्याचे षडयंत्र हाणून पाडा

**गझल मंथन साहित्य संस्थेच्या वतीने नुकतेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड येथे गझल संमेलन संपन्न झाले, या गझल संमेलनाचे अध्यक्ष प्रसिद्ध गझलकार डॉ. राज रणधीर यांच्या अध्यक्षीय मनोगताचा संक्षिप्त भाग प्रकाशित करीत आहोत.**

आज अकारांत स्वरकाफिया गझलेमध्ये घुसू पाहतोय, उद्या इंग्रजी शब्दांचा भडिमार मराठी राजभाषेला भीक देणार आहे का? उद्या अष्टाक्षरी गझल किंवा असेच अजून नवीन काही मराठी गझलेला बघायला मिळणार आहे का? हीच आपली अभिजात मराठी भाषेच्या अभिजात दर्जाची सुरुवात असणार आहे का ? हे यक्ष प्रश्न मला अस्वस्थ करीत आहेत.

गझलतंत्रात आहे म्हणून ती अवघड आहे हे मान्य आहे, परंतु तिला सोपी करण्यासाठी एक एक नियम तोडून नवनवीन नियम नवोदीतांवर लादण्यात येवून गझलेची दिशाच भरकटून टाकण्याचे षडयंत्रतर तर चालू नाही ना ? याचे सिंहावलोकन करण्याची ही वेळ आपल्यावर आलेली आहे.

मी एक साधा डॉक्टर आहे. शाळेत असताना मराठी भाषेकडे माझे कमालीचे दुर्लक्ष व्हायचे. आमच्या मॅडम मला सांगायच्या रागवायच्या राज मराठी भाषेकडे लक्ष दे नाहीतर टक्केवारी कमी होईल, परंतु आधीपासून डॉक्टर व्हायचे स्वप्न उराशी बाळगणारा मी मला या गोष्टी गौण वाटायच्या निरर्थक वाटायच्या. मेडिकल कॉलेजला कुठे मराठी असणार आहे, जाऊद्या ना ? परंतु डॉक्टर झाल्यानंतर घरदार झाल्यानंतर माझ्यातली कविता पुन्हा डोक वर काढू लागली आणि केव्हा गझलेची ओढ लागली हे ही कळले नाही मराठी गझलेसाठी मराठी व्याकरण शिकावेच लागते हे कळाल्यावर मी ठारवेडा ,मराठी व्याकरणाचे पुस्तक विकत घेण्यासाठी जालन्यावरून छत्रपती संभाजीनगरला येवून ही पुस्तक विकत घेतली आणि व्याकरण पुन्हा नव्याने शिकण्यास सुरुवात केली. माझे कुटुंब माझे मित्र आणि माझे रुग्ण मला त्यावेळी वेड्यात काढायचे हे काय सोंग आहे म्हणायचे?

गझल समर्पण मागत असते, त्याग केल्याशिवाय आयुष्याचा यज्ञ पूर्ण होत नाही. चोवीस तास मनात त्यावेळीपासून नुसती गझल आणि गझल आणि गझलच आहे .

महाराष्ट्रातील नामवंत आणि सुप्रसिद्ध कवियित्री बहिणाबाई चौधरी या अडाणी असूनही त्यांनी अष्टाक्षरीचे नियम मोडले नाही किंवा त्यात काही बदल केल्याचे माझ्यातरी वाचनात नाही , तुम्ही आम्ही तर शिकलेले आहोत, अकारांत स्वरकाफियापर्यंत गझल चर्चिली जाते आणि आपण का शांत आहोत? मी असे कुठे म्हणतो आहे की, सूट घेऊच नये, असे बिल्कुल नाही पण खयालात तितकी चपखलता यायला हवी की तुम्ही घेतलेली सूट तुमच्या खयालापुढे नतमस्तक व्हायलाच हवी. रसिकांना तुमची सूट न दिसता खयालातील दर्जा दिसायला हवा.

तंत्रशुद्ध गझलेचा गळा दाबण्याचे षडयंत्र चालू आहे आणि गझलेच्या नैसर्गिक शैलीत मिश्रण करण्याचा प्रकार राजरोसपणे चालू आहे. हे म्हणजे गल्लीच्या क्रिकेटसारखेच झाले.एक टप्पा आऊट बॉल कुणाच्या छतावर गेला की आऊट.

अभिजात मराठी राजभाषेच्या अभ्यासानुसार आणि गर्भश्रीमंत राजभाषेतील शब्दाच्या आपापल्या श्रीमंती आणि गरीबीनुसार काही साहित्यिक तंत्रशुद्ध गझलेला त्यांच्या परिसिमेनुसार गझलेला ठराविक कक्षेमध्ये आणण्यासाठी प्रयत्न करता आहेत. बदल ही काळाची गरज हे सर्वस्वी मान्य परंतु केवळ शब्ददारिद्र्य आहे म्हणून बदल घडवून आणणे संयुक्तीक आहे का? हे बदल नव्या पिढीला आणि नवोदितांना संभ्रमित करणारे नाहीत का? पुन्हा मी सांगितलेले उपवासाचे नियम इथे लागू होत आहेत का ? हे रोज निर्माण होणारे किंवा तयार केले जाणारे म्हणू, हे नियम बघून आत्महत्याच करावी की काय असे वाटायला लागते, परंतु हिरा तो हिराच असतो, काचांनी कितीही हिरा बनण्याचा प्रयत्न केला तरी उष्णतेच्या परिक्षेत त्याची खरी कस लागत असते म्हणून आपण हिऱ्याचा



की काचेचा वारसा जपतो आहोत हे येणार काळ ठरवणार आहे.

घासून काढ काचा आकार दे हिऱ्याचा
स्पर्धेत तो जगाच्या टिकणार फार नाही

गझलेचा अशाप्रकारे उपहास करणाऱ्या मठाधिपतीपासून आता सावध होण्याची वेळ आलेली आहे. अल्पज्ञानी गुरू आणि संभ्रमित गुरूंचे चेले यांच्यामध्ये गझल दिशाहीन होण्याची भिती वाटते आहे. गुरूपदाच्या मठाधिपदासाठी वाट्टेल ते ज्ञान अल्पबुद्धिधारक वाटत फिरता आहेत आणि म्हणून ज्ञानपीठ आणि नुसते पीठ यातील फरक दाखवून देण्याची योग्य वेळ आणि जिम्मेदारी तुमच्या आमच्यावर येवून ठेपलेली आहे.

म्हणून या मृगजळातून बाहेर पडून जे अडकले आहेत त्यांनाही दिशा देण्याचे कार्य आपल्यावर आहे याची जाणिव तुम्हाआम्हाला आहेच. अन्यथा वृत्तदोष, लय जाणे ,यतीभंग आणि नवनवीन नियमावली ही तर कृत्रिम आभुषणे आहेत.या अर्थहीन अलंकाराच्या वाळवीपासून आपल्या नैसर्गिक सुंदरता असलेल्या गझलेला आपल्याला वाचवायचे आहे.

आज अनेक गझलकार तंत्रशुद्ध गझल अत्यंत छानपैकी लिहीत आहेत हे बघून समाधानही आहेच. जरी ही संख्या कमी असली तरी ती गझल मंथन आणि अनेक गझलेचा प्रसार आणि प्रचार करणाऱ्या माध्यमांना बघून हे चित्र लवकर बदलेल हा विश्वास आणि खात्रीही वाटते आहे.

उर्दूला हजारो वर्षाचा इतिहास आहे आणि मराठी गझलेला बाळसे यायचे बाकी आहे, हा आपल्या अभिजात मराठी राजभाषा असलेल्या गझलेवर डाग लागतो आहे आणि तो पुसून काढण्याची जबाबदारी ही आपल्या सर्व गझलकारांची नाही का? आपल्याला नव्या पिढीला एक प्रेरणादायी आणि संभ्रमहिन रस्ता द्यायचा असेल तर ही जबाबदारी आपण स्वीकारायला हवी

अर्थात कालांतराने गझल मंथन झाल्यावर जे सर्वश्रेष्ठ आहे तेच टिकणार आहे हे त्रिकालाबाधित सत्य आहे.म्हणून एखादी रचना लिहिल्यावर लगेच सोशल मेडियावर पोस्ट करण्यापूर्वी थांबा ती रचना पुन्हापुन्हा तपासा यात आवश्यक ती सुधारणा करा मगच ती सोशल मीडियावर येवू द्यावी.आपल्या लिखाणाच्या सीमा आपल्याला ओळखता यायला हव्या , आपल्या लिखाणाचा एक पिंड असतो, कुणाच्या प्रभावाखाली येवून सुरवातीच्या काळात लेखन होऊ शकते हे स्वाभाविक आहे परंतु यातून बाहेर पडून आपली स्वतःची शैली ओळखून गझल लिखाण व्हायला हवे.

खयाल सशक्तपणे मांडणे ही एक कला आहे यासाठी सराव चिंतन मनन आवश्यक असते. जसे की एक उदाहरण बघा की मी तुझ्यावर प्रेम करतो हे नॉर्मल बोलणे झाले यात काही वेगळेपण नाही परंतु मला आयुष्यभर तुझ्या घरचे पाणी भरावेसे वाटते रे!! ही शैली बघा खयाल तोच परंतु व्यक्त होण्याची शैली ही प्रभावशाली हवी.

एखाद्या गझलकाराला एखादा मुक्कमल खयाल कसा सुचला असेल हा प्रश्न आपल्याला पडायला हवा.चांगले लिखाण झाल्यानंतर एक रितेपणाचा आभास लेखकाला नक्कीच होतो.

काफियासुमारी ... तंत्रशरणात
प्रभावाखाली गझल लेखन

या गोष्टी आवर्जून अभ्यासाव्यात. सराव चिंतन आणि सातत्याने या गोष्टीवर प्रभुत्व मिळवणे सहज असते.

आपण येणाऱ्या पिढीला नावीन्यपूर्ण काय देवू शकलो हा प्रश्न साहित्यिकाला पडायलाच हवा नवोदीतांना प्रोत्साहन देण्याचा फायदा ही आहे आणि तोटा सुद्धा.अनावश्यक प्रोत्साहन एखाद्याला संपवू शकते तसेच अनावश्यक हीन लेखणेही म्हणून या गोष्टीवर विचार करणेही आवश्यक आहे.

वृत्तामध्ये लेखन करताना लघु गुरूची सूट घेताना सहजता जपली जाणे आवश्यक असते.शब्दाचे लवचिक स्वरूप आणि ते योग्य पद्धतीने वापरणे यात गझलकाराच्या प्रतिभेचे कौशल्य दिसून येते मात्र यासाठी सराव चिंतन मनन याची नितांत सातत्यपूर्ण आवश्यकता असते.

कधीकधी शब्दाच्या मुळ स्वरूपात अशंतः बदल करून गझलकार मात्रापूर्ती किंवा वृत्तपूर्ती करतात.तांत्रिक दृष्टीने गझल अचूक असण्यासाठी ही लवचिकता किंवा शब्दाच्या मूळ स्वरुपातील बदल आवश्यक असतो मात्र व्याकरणाच्या बाबतीत अतिकाटेकोर असणारे जे की वृत्तामध्ये लिखाण करत नाहीत परंतु व्याकरण हा त्यांच्यासाठी जिव्हाळ्याचा विषय असतो ते अशाप्रकारच्या सूटीवर आक्षेप घेऊ शकतात.व्याकरणदृष्ट्या त्यांचा आक्षेप रास्तही आहेच म्हणूनच अपवादात्मक परिस्थितीतच सूट घ्यायला हवी जसे गझल लिखाण एक कला आहे तसेच चपखलता जपून सूट घेणे ही सुद्धा एक कलाच आहे.परंतु सूट घेता येणे ही सवलत जरी असली तरी हा नियम नाही याची जाण आणि भान गझलकाराला हवे म्हणजे हवेच.शेवटी काही उदाहरणे वांगिदाखल देतो आहे ती अभ्यासावीत

परंतु चे परंतू घेणे
मैत्रीचे मैतरी
खात्री चे खातरी
आपुले चे अपुले
खूण चे खुण

काही सूट या अर्थबदल करतात याचाही विचार व्हायला हवा.विशेष करून मात्रावृत्तामधे.गझल लिखाणापेक्षा गझल जगण्यावर आपण भर द्यायला हवा गझल डोक्यात न जाऊ देता फक्त हृदयातच तिचे वास्तव्य अभाधित राहो , ही सदिच्छा.

**-डॉ. राज रणधीर**

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# पर्यटन व्यवसायात महिलांना मोठी संधी - अलका भुजबळ

**मुंबई -** पर्यटन व्यवसायात महिला व्यावसायिकांची संख्या आजही अत्यल्प असून, त्यांच्या अंगी असलेल्या अगत्य ,आतिथ्य आणि एकाच वेळी अनेक गोष्टी करण्याच्या कौशल्यामुळे त्यांना या व्यवसायात मोठी संधी आहे, त्यामुळे महिलांनी या संधीचा लाभ घेतला पाहिजे,असे आवाहन न्यूज स्टोरी टुडेच्या निर्मात्या सौ अलका भुजबळ यांनी केले.अर्थसंकेत 'महाराष्ट्राचा लोकप्रिय ब्रँड' पर्यटन विशेष कार्यक्रम नुकताच मुंबईतील कोहिनुर बिझनेस स्कुल मध्ये मोठ्या उत्साहात झाला, त्यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या.

सौ भुजबळ पुढे म्हणाल्या, पर्यटन क्षेत्रातील कौटुंबिक परंपरा असलेल्या हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्याच महिला आज पर्यटन क्षेत्रात दिसून येतात. पण पर्यटन क्षेत्राशी निगडीत अशा प्रवास व्यवस्था, निवास व्यवस्था, वाहन व्यवस्था, पर्यटन मार्गदर्शक अशा अनेक प्रकारच्या बाबी महिला सक्षमपणे हाताळू शकतील अशा आहेत. त्यात पर्यटन व्यवसायाची व्याप्ती ही संपूर्ण जगभरासाठी आहे. त्यामुळे

महिलांनी या क्षेत्रात पुढे आले पाहिजे.महिलांचे या व्यवसायातील महिलांचे प्रमाण वाढण्यासाठी त्यांच्यासाठी पुस्तकार सुरू करण्यात यावे,अशी सूचना ही त्यांनी केली.

दुसरे प्रमुख पाहुणे ग्लोबल अँजेलो ग्रुपचे प्रमुख श्री अग्नेलो राजेश अथयाडे यांनी संपूर्ण जगाचे प्रतिबिंब भारतात आहे.त्यामुळे पर्यटनाद्वारे कोणत्याही राज्याला सातत्यपूर्ण उत्पन्न मिळते असे सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बोलताना डॉ. अविनाश फडके म्हणाले की, मराठी माणूस उत्तमरीत्या व्यवसाय करू शकतो. त्याने आपला उद्योग लघु व मध्यम स्तरातील असला तरी त्याची शेअर बाजारात नोंदणी करून त्याद्वारे भांडवल उभे करून व्यवसाय मोठे केले पाहिजेत, असे आवाहन त्यांनी केले.

मराठी माणसाने मोठ्या प्रमाणात उद्योग व्यवसायात पुढे येण्यासाठी मानसिकता बदलणे गरजेचे आहे. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांच्या नियमांचे अनुपालन करायला मराठी उद्योजक कमी पडताना दिसतात, असे विचार वस्तू व सेवा कर उपायुक्त श्री. चैतन्य ताथारे यांनी मांडले.

कोहिनुर बिझनेस स्कुलच्या संचालिका डॉ. स्वेतलाना तातूस्कर यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी कोहिनुरच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात मोठे कार्य केल्याचे त्यांनी सांगितले.

'महाराष्ट्राचा लोकप्रिय ब्रँड' संकल्पनेमध्ये सहभागी ब्रँडचे सोशल मीडियाच्या माध्यमातून सात दिवस व्होटिंग घेतले जाते. व्होटिंगनंतर जास्त व्होट मिळालेल्या विभागास पुरस्कार दिला जातो, असे अर्थसंकेतचे संस्थापक डॉ. अमित बागवे यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील हजारो पर्यटन संस्थांपैकी फक्त नऊ संस्था बनू शकल्या



'महाराष्ट्राचा लोकप्रिय ब्रँड'. ट्युलिप हॉलिडेज, खवणे कयाक्स, दीपक वर्ल्ड व्हेकेशन्स 'मोस्ट पॉप्युलर ब्रँड' ठरले. बेसिल लीफ हॉलिडेज, जोगळेकर कॉटेज, शिवांजली हॉलिडे होम, राजगुरू टूर्स बेस्ट कस्टमर सर्व्हिस ब्रँड ठरले. ईशा टूर्स आणि फ्लाईंग कोकण मोस्ट इन्नोव्हेटिव्ह ब्रँड ठरले. 'आयकॉनिक टुरिझम ब्रँड ऑफ महाराष्ट्र' या पुरस्काराने 'वेदभुमी इको व्हिलेज'चा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंदार नार्वेकर यांनी केले. रचना आर्टस् अँड क्रिएशन्सच्या संस्थापिका सौ. रचना लचके बागवे यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला पर्यटन व्यवसायातील व्यक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# शेख उमर याचा वयाच्या सातव्या वर्षात जीवनातला पहिला रोजा

**परतुर । प्रतिनिधी -** शेख उमर शेख अझहर यांचा मुलगा यांनी ७ वर्षाचा असून त्यांनी आपला पवित्र महिन्यातला रमजानचा पहिला रोजा उपास ठेवण्यात आला असताना नातेवाईक व मित्र परिवारातून सर्वांना कौतुक होत आहे तसेच पवित्र रमजान चा



हा रोजा उपास ७ वर्षांचा मुलानी ठेवल्यामुळे शहरातील नागरिकांनी त्याचे कौतुक केले आहे. याप्रसंगी शेख अझहर यांनी आपले विचार व्यक्त केले रमजान हा केवळ उपवास ठेवण्याचा महिना नाही तर तो आत्मशुद्धी संयम आणि परोपकाराचा महिना आहे. या महिन्यात उपवास म्हणजे फक्त अन्न आणि पाणी टाळणे नसून आपल्या मनातील वाईट विचार ईर्ष्या लोभ आणि अहंकार यांना दूर करण्याचा सोहळा असतो.सकाळी लवकर जेव्हा संपूर्ण जग शांत असते तेव्हा रमजानचे पहिले किरण मनावर उमटतात कुटुंब एकत्र येऊन सेहरी घेतात त्या क्षणी एकत्र असण्याचा आनंद डोळ्यांच्या कडा ओलावणारा असतो असे कितीतरी लोक आहेत ज्यांना एकवेळचे अन्न मिळविण्यासाठीही संघर्ष करावा लागतो उपवासात केवळ भुकेची जाणीव होत नाही तर भुकेच्या वेदना सहन करणाऱ्या गरिबांचे दुःखही मनाला जाणवते.दिवसभर उपवास केल्यानंतर संध्याकाळी जेव्हा अजानचा आवाज कानावर पडतो तेव्हा मुस्लिम बांधवांना मनाला एक वेगळेच समाधान मिळते पहिला घास तोंडात टाकताना वाटते अल्लाहने दिलेल्या या कृपेचे आपण कितीही आभार मानले तरी ते कमीच रमजान मध्ये माणसाला आपल्या आयुष्यातील सगळ्या सुखसुविधांची किंमत कळते;रमजान फक्त उपवासाचा च नाही तर या महिन्यात दानधर्म गरीबांना मदत आणि दुसऱ्यांची दुःखं समजून घेणे सर्वात महत्त्वाचे मानले जाते आपल्या समोरच्या ताटात भरपूर अन्न असताना रस्त्याच्या कडेला उपाशी झोपणाऱ्याचा विचार मनाला हलवून जातो म्हणूनच या महिन्यात फितरा आणि जकात देण्याची परंपरा आहे. रात्रीच्या प्रार्थनेसाठी जेव्हा मुस्लिम डोळे मिटून हात वर उचलतात तेव्हा केवळ स्वतःसाठी नव्हे तर संपूर्ण मानवजातीसाठीही दुआ मागितली जाते हे अल्लाह प्रत्येक भुकेल्या पोटी अन्न मिळू दे प्रत्येक पाण्यासाठी तहानलेल्या ओठांना पाणी मिळू दे प्रत्येक दुःखी हृदयात आनंद भरू दे असा शेख अझहर त्यांनी मुलाच्या पहिला उपास ठेवल्यानंतर सर्व मानव जातीसाठी प्रार्थना केली आहे.




पान १ वरुन

## खोट्या तक्रारी करून ...

खोटे-नाटे कागदपत्र कोर्टात सादर करून अतिरिक्त मावेजा मिळवला आहे. आज रोजी पाझर तलावाची भिंत फोडून सर्व जमीन कसत आहे. यांच्या सर्व तक्रारी प्रशासनाला झाल्यामुळे प्रशासनाची दिशाभूल करण्यासाठी अश्या खोट्या तक्रारी अर्जदार सिद्धेश्वर सोळंके व गावातील गैरकायद्याचे मंडळी यांना हाताखाली धरून वेळोवेळी तक्रारी करत आहे. या पूर्वी त्याच्या गैरकायद्याचे मंडळी हाताशी धरून त्यांनी बर्याच तक्रारी केल्या होत्या त्या सर्व कामाची प्रशासना मार्फत चौकशी होऊन अहवाल शासन दरबारी उपलब्ध आहे. खोट्या तक्रारी करणार्यावर व ग्रामपंचायतची बदनामी करणार्यावर योग्य कारवाई करण्यात यावी अशी मागणी देखील या निवेदनात केली आहे.

निवेदनावर रामेश्वर खुळे, सौ. पल्लवी सोळंके, सौ. कावेरा सोळंके, आकाश मोरे, सौ. गवळण गाते आदी ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



## जिल्हा परिषद शाळा ब्रह्मपुरी येथील विद्यार्थ्यांनी केली ग्रहताऱ्यांची अनोखी सफर



**दत्ता देशमुख**

**जाफ्राबाद -** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा ब्रह्मपुरी तालुका जाफराबाद येथील विद्यार्थ्यांनी दिनांक १५ मार्च २०२५ रोजी एक वेगळाच अनुभव घेतला.

जालना येथील प्रसिद्ध पोलाद स्टील कंपनी मार्फत विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक जाणीव जागृती तसेच भौगोलिक संकल्पना स्पष्ट होण्यासाठी फिरते तारांगण हा उपक्रम अनेक दिवसापासून चालू आहे. याच उपक्रमांतर्गत शाळेतील विज्ञान शिक्षक अभिजीत बंगाळे यांनी पोलाद स्टीलच्या उपक्रमाची दखल घेत त्यांच्याशी संपर्क साधून ब्रह्मपुरी येथील शाळेतील विद्यार्थ्यांना हे तारांगण पाहण्याची व्यवस्था केली आणि सर्व विद्यार्थ्यांनी आपली सूर्यमाला कशाप्रकारे दिसते सूर्यमालेत असणारे सर्व ग्रह त्यांची वैशिष्ट्य आकाशात फिरल्यानंतर कसे दिसतात हे या तारांगणामध्ये बघितले.

या तारांगणासाठी पोलाद स्टीलचे श्री मनगटे साहेब व श्री माने साहेब यांनी मोलाचे सहकार्य केले. विद्यार्थ्यांच्या जाणीव जागृती या केवळ तोंडी शिकून पूर्ण होत नसून त्यासाठी प्रत्यक्ष अनुभव सुद्धा महत्त्वाचा आहे. आणि आज या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना विज्ञान तथा भूगोल या विषयाचे प्रत्यक्ष ज्ञान घेता आले. विद्यार्थ्यांना अतिशय आनंद झाला.

या उपक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री भास्कर शिंदे सर व शिक्षक श्री किशोर निमजे सर, श्री बद्रीनाथ इंगळे सर, श्री लक्ष्मण जवंजाळ सर, श्री विनोद शिंगणे सर, श्री अविनाश केंदळे सर तसेच शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री दीपक शेवत्रे तथा सदस्य तसेच ग्रामस्थ उपस्थित राहिले.

तसेच या तारांगणासाठी गावचे सरपंच सन्माननीय श्री शिवाजीराव शेवत्रे यांनी त्यांच्या शेतातील बखारीवर जागा उपलब्ध करून दिली. यांच्या अमूल्य सहकार्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना आनंदाने तारांगण पाहण्याची संधी मिळाली.

त्यामुळेच असे म्हणता येईल

शाळेला असावा गावाचा आधार

आणि गावाला असावा शाळेचा आदर.

# श्री संत जगतगुरु तुकाराम महाराज बीज निमित्य हरीनाम कीर्तन आणि अन्नदान संपन्न



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथे श्री संत जगतगुरु तुकाराम महाराज बीज निमित्य हरीनाम कीर्तन आणि अन्नदान चा कार्यक्रम मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला. या हे तिसरे वर्ष असून या वेळी या कार्यक्रमात विशेष करून तरुण मंडळी यांनी मोठा सहभाग नोंदविला. या कार्यक्रमा निमित्य ह भ प निवृती महाराज कोरडे यांच्या मधुर वाणीतून कीर्तन पार पडले.श्री संत जगतगुरु संत तुकाराम महाराज बीज यांच्या कार्यक्रमात अन्नदान हे खूप मोठ्या प्रमाणात होताना दिसले. हे यशस्वी तिसरे वर्ष असून छोट्या मोठ्या सहभाग आणि देणगी मुळे हा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात झाला. या निमित्य ठेवलेल्या कीर्तनाला ही मोठा प्रतिसाद भेटला असून कोरडे महाराज यांची कीर्तन रुपी सेवा खूप चांगली पार पडली. चवदार वरन पोळी यांची पंगत ही उशिरा रात्री पर्यंत चालली होती. या वेळी जवळपास दहा कुंटल चा मोठा भंडारा पार पडला.येथील भंडारा हा खूप चवदार असून या भागातील महिला पुरुष तरुण मंडळी यांनी सहभाग घेत हा सगळा कार्यक्रम यशस्वी केला.

## ‘त्या’ पाण्यासाठी आंतरराष्ट्रीय निविदा प्रक्रिया - उद्योगमंत्री

**मुंबई -** समुद्राच्या पाण्याचे विलोपन हा प्रकल्प मुंबईसाठी हाती घेतला असून या प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय निविदा प्रक्रिया राबवली जाणार असल्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधानपरिषदेत सांगितले. सदस्य राजहंस सिंह यांनी उपस्थित केलेल्या मुंबई शहर व उपनगरातील पाणीपुरवठाविषयी लक्षवेधीला सूचनेला उत्तर देताना मंत्री सामंत बोलत होते.



**श्रीमंत राजे मल्हारराव होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी समाजीक कार्यकर्ते दत्ता पाचे, अण्णा मैंद, ऋषिकेश सोनसाळे, लहू जोशी, राजू पाचे, अमोल पाचे, वैभव धारे, पवन जोशी, शुभम मतकर, गजानन सोनसाळे, वेदांत सोनसाळे व महिला मंडळ देखील खूप मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# औरंगजेबची कबर; संविधान आणि मानवतेचा सन्मान ठेवा - ॲड. महेश धन्नावत

**जालना । प्रतिनिधी -** मानवाधिकार कार्यकर्ते ॲड. महेश धन्नावत यांनी म्हटले आहे की, औरंगजेबची कबर हटविणे हे भारतीय संविधान व मानवी मूल्यांच्या विरोधात ठरेल. त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निर्णयाचा - परमानंद कटारा विरुद्ध युनियन ऑफ इंडिया (१९८९) - उल्लेख केला आणि सांगितले की संविधान केवळ जिवंत व्यक्तींनाच नव्हे तर मृत व्यक्तींनाही सन्मान व प्रतिष्ठेने वागणुकीचा अधिकार देते.

त्यांनी असेही सांगितले की, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानेही १४ मे २०२१ रोजी सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्र पाठवून स्पष्ट निर्देश दिले होते की मृत व्यक्तींच्या मान-सन्मानाचे आणि त्यांच्यावरील मानवाधिकारांचे रक्षण केले जावे.

ॲड. धन्नावत म्हणाले की, औरंगजेबची कबर हटविण्याची मागणी केवळ कायदेशीर दृष्टिकोनातूनच अयोग्य नाही, तर ती भारतीय संस्कृती आणि मूल्यांच्या विरोधात आहे, जी आपल्याला सर्वांप्रती करुणा व सहिष्णुतेची शिकवण देते. त्यांनी स्पष्ट केले की औरंगजेबची कबर कोणत्याही अतिक्रमणावर आधारलेली नाही, तसेच मराठा साम्राज्य किंवा भारतीय राज्यकर्त्यांकडून कधीही तिच्या हटविण्याची मागणी झालेली नव्हती.

**समाजाला शांती व एकतेचा संदेश :**

संविधान व कायद्याचा सन्मान करा - भारताचे संविधान सर्वांना समान अधिकार देते, मग तो व्यक्ती जिवंत असो किंवा मृत.

इतिहासाकडे समजूतदारपणे पाहा - इतिहास जाणून घेणे महत्त्वाचे आहे, पण त्याचा उपयोग समाजात फूट पाडण्यासाठी होऊ नये.

वादांपासून दूर रहा - कबरसारख्या विषयांवरून समाजात भांडणे न करता, समाजहितासाठी एकत्र येणे आवश्यक आहे.

आपसी बंधुभाव मजबूत करा - भारत ही विविधतेत एकतेचे प्रतीक आहे. सर्व धर्म, जाती व समुदाय मिळून समृद्ध राष्ट्र घडवतात.

युवकांना सकारात्मक दिशेने प्रवृत्त करा - युवक समाजाच्या उर्जेचे व परिवर्तनाचे केंद्रबिंदू आहेत. त्यांना हिंसेकडे नव्हे, तर शांतता व समरसतेकडे घेऊन जाणे आवश्यक आहे.

ॲड. धन्नावत पुढे म्हणाले की, संपूर्ण भारतावर राज्य करणाऱ्या औरंगजेबाचा मृत्यू महाराष्ट्रात झाला, यावरून छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज आणि मराठा साम्राज्याने केलेल्या गौरवशाली संघर्षाची प्रचिती येते. उल्लेखनीय म्हणजे, औरंगजेबच्या इच्छेनुसारच त्याची कबर साधेपणात ठेवण्यात आली होती, कारण शेवटी त्यालाही हे जाणवले होते की संपत्ती, सत्ता किंवा वैभव हे सर्व येथेच राहून जातात आणि अखेरीस ईश्वरापुढेच हजर व्हावे लागते. शेवटी ॲड. महेश धन्नावत म्हणाले की, कोणत्याही मृत व्यक्तीच्या सन्मानाशी छेडछाड न करणे हीच आपली संस्कृती आहे. समाजाने एकसंघ राहून देशात सौहार्द टिकवावे आणि आपसी वादांपासून दूर राहावे.

## नागपूर हिंसाचार घटना; जालना पोलीस अलर्ट मोडवर

**जालना । प्रतिनिधी -** नागपूर मध्ये घडलेल्या हिंसाचाराच्या घटनेनंतर जालना पोलीस क्शन मोडवर आलीय. शहरातील संवेदनशील ठिकाणी पोलिसांकडून पेट्रोलिंग केली जात असून सोशल मीडियावरही पोलिस लक्ष ठेवून आहेत. अशी माहिती जालन्याचे अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांनी मंगळवार (दि १८) रोजी दुपारी तीन वाजता माध्यमांशी बोलताना पोलीस अधीक्षक कार्यालयात दिलीय. जालन्यातील नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून जातीय सलोखा कायम ठेवावा असं आवाहन ही जालन्याचे अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांनी केलंय. जालन्यात सार्वजनिक शांतता कायम राहावी यासाठी पोलीस सज्ज असल्याचं ही आयुष नोपाणी म्हणाले.



## दिंडी महामार्गावरील तळणीजवळ बिबट्याचं परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण



**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील मंठा तालुक्यातील दींडी महामार्गावरील तळणीजवळ बिबट्याचं दर्शन झालंय.. रात्रीच्या वेळी बिबट्या काही नागरिकांना दिसून आलाय.. याआधीही काही नागरिकांना बिबट्या दिसला होता. त्यानंतर बिबट्याचा बंदोबस्त करण्याची तक्रार वनविभागाकडे करण्यात आली होती. मात्र याकडे वनविभागाने दुर्लक्ष केलं. त्यानंतर पुन्हा बिबट्या दिसल्यानं परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भितीचं वातावरण निर्माण झालं आहे.

